**PARLE MAHOTSAV**

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

दि. २३.१२.२०१५

कृपया प्रसिद्धीसाठी

# पुढील वर्षी आपल्या संघासह महोत्सवात सामील व्हायला आवडेल !

## अभिनेता अभिषेक बच्चनचे पार्ले महोत्सवामध्ये उद्गार

मुंबई दि.२३ : १६ व्या पार्ले महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी सुप्रसिद्ध अभिनेता अभिषेक बच्चन यांनी भेट देऊन खेळाडूंचा उत्साह वाढवला. आपले ही कबड्डी व फुटबॉल संघ असल्याचे आवर्जून उल्लेख करत इथले वातावरण पाहता पुढील वर्षी आपल्या संघासह पार्ले महोत्सवात सहभागी व्हायला आवडेल असेही ते म्हणाले. त्यानंतर मैदानातील सुरु होणाऱ्या व्हॉलीबॉलच्या २, कबड्डीच्या ३ व बॉक्स क्रिकेटच्या एक सामन्यातील खेळाडू व पंच यांना शुभेच्छा दिल्या. १०० हून अधिक जणांसोबत हस्तांदोलन करीत वैयक्तिक शुभेच्छा देणाऱ्या या सुपरस्टारने आपल्या विनम्र स्वभावाने व क्रीडाप्रेमाने स्टेडियममधील सुमारे पाच हजार क्रीडारसिकांचे मन जिंकले.

जगभरातील भारतीय आपल्या अभिनयामुळे आपले चाहते तर आहेतच, पण त्याच सोबत सिद्धिविनायक मंदिर, लालबागचा राजाचे भक्तिभावाने दर्शन घेताना किंवा गुढी पाडव्याच्या स्फूर्ति यात्रेत सहभागी होताना आपल्याला पाहतो तेव्हा आपलेपणाचे एक नाते जूळते अशा भावना अभिषेक बच्चन यांच्या स्वागतप्रसंगी प्रमुख आयोजक आमदार पराग अळवणी यांनी व्यक्त केल्या. तसेच त्यांनी महोत्सवाच्या प्रथेनुसार अभिषेक बच्चन यांचे पुस्तक देऊन स्वागत केले. तर ब्रॅण्ड एम्बेसडर स्वप्निल जोशी यांनी फ्रेंडशिप बॅंड बांधला.

महोत्सवाच्या तीन दिवसात ५० मीटर शर्यत, गोळा फेक, स्लो सायकलिंग, कबड्डी, व्हॉलीबॉल, रस्सी खेच व बॉक्स क्रिकेट अशा स्पर्धांमधून नागपुर, पुणे, ठाणेसह मुंबईच्या कानाकोपऱ्यातून सुमारे आठ हजार खेळाडूंनी भाग घेतला. विशेषतः आंतरराष्ट्रीय खेळाडू अभय कुर्वे, तर राष्ट्रीय खेळाडू भाग्यश्री धार्मिक, भाग्यश्री रोकडे, वैभवी जबलपोरे, जयश्री ठाकरे, करिश्मा शेंद्रे, विशाखा देशमुख यांना प्रेक्षकांकडून विशेष दाद मिळत होती. तसेच प्रो कबड्डी स्पर्धेतील मुंबई संघाचा रिशांक देवाडिगा, माजी उपमहापौर अरुण देव, मनपा विधि समिति अध्यक्ष महेश पारकर हे या प्रसंगी उपस्थित होते.

---

सदर प्रसिद्धिपत्रक गुरुचरण सिंह संधू यांनी प्रसिद्ध केले आहे.